# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

## (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## विद्यार्थ्यांशी संवादातून साधला मेट्रो कनेक्ट



नागपूर: शहरातील विविध क्षेत्रातील नागरिकांना मेट्रोच्या कार्यप्रणाली संबंधी माहिती मिळावी या उद्देशाने नागपूर मेट्रोने सातत्याने मेट्रो संवाद उपक्रम राबवला आहे. याचाच एक भाग म्हणून नागपूर मेट्रोने आजवर शाळा, महाविद्यालय, शासकीय कार्यालय, बँक, रूग्णालयसारख्या विविध संस्थांमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करत मेट्रोच्या विविध पैलूंबद्दल माहिती दिली. याच शृंखलेचा एक भाग म्हणून नागपूर मेट्रो तर्फे नुकतेच आदर्श विद्या मंदिर व दळवी नर्सिंग महाविद्यालय व रुग्णालय येथे मेट्रो संवाद उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

सेन्ट्रल एव्हेन्यू वरील आंबेडकर स्टेशन जवळ असलेल्या या शाळेत नागपूर मेट्रो तर्फे मेट्रो संवाद आयोजित करण्यात आला. श्रीमती सी बी आदर्श विद्या मंदिर हायस्कुल आणि श्रीमती जी जी सारडा इंग्लिश मिडीयम हायस्कुल या दोन्हीही शाळांचे विद्यार्थी या संवाद कार्यक्रमात सहभागी झालले होते. ९ आणि १० वर्गाच्या विद्यार्थ्यांना या संबंधाने मार्गदर्शन करण्यात आले. सुमारे २५० विद्यार्थी उपस्थित होते. या उपक्रमाला दरम्यान नागपूर मेट्रो तर्फे एकूणच प्रकल्पासंबंधी तसेच प्रवासी सेवेन्तर्गत असलेल्या विविध उपाय योजनांची माहिती दिली गेली. महत्वाचे म्हणजे उपस्थित विद्यार्थ्यांनी संवाद साधत मेट्रो प्रवसादरम्यान येणाऱ्या विविध अडचणींसंबंधी देखील माहिती जाणून घेतली. या कार्यक्रमादरम्यान शाळेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री मयूर शाह, मुख्याध्यापिका श्रीमती नागपाल मॅडम, श्री डहाके सर, श्री सुनील बुटला, चौधरी मॅडम तसेच या दोन्हीही शाळांचा इतर शिक्षक आणि कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

मेट्रो संवाद उप्रकमचाच एक भाग म्हणून नागपूरच्या घरोबा मैदान परिसरातील दळवी नर्सिंग महाविद्यालय व रुग्णालय येथे देखील मेट्रो संवादचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील नर्सिंग महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसोबतच रुग्णालयाचे शिक्षक आणि इतर कर्मचारी यात सहभागी झाले होते. शहरातील अतिशय जुने आणि या क्षेत्रातील नावाजलेले नर्सिंग महाविद्यालय अशी या संस्थेची ओळख आहे. महाविद्यालयात शिकणारे विद्यार्थी कोरडी, वर्धमान नगर भागातून येतात. घरून महाविद्यालयाला येताना तसेच परत जाताना येणार्या अडचणींबद्दल विद्यार्थ्यांनी मेट्रोचं अधिकाऱ्यांशी चर्चा केली. या दोन्हीही शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मेट्रोचे महा कार्ड, त्यावर मिळणारी सूट, सेलिब्रेशन ऑन व्हील्स, सारख्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. या दरम्यान प्रशासकीय अधिकारी श्री रवींद्र कोमेजवार, प्राचार्या श्रीमती मानसी वंजारी आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.